दैनिक यशवंत

# निर्भीड मतदार हाच सदृढ लोकशाहीचा पाया आहे : प्रा.डॉ.संतोष पाटील

देगलूर(प्रतिनिधी):- अडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित देगलूर महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागाच्यावतीने राष्ट्रीय मतदान दिवस २५ जाने २०२२ रोजी साजरा करण्यात आला. या निमित्ताने प्रा.डॉ.संतोष पाटील राज्यशास्त्र विभाग प्रमुख,दयानंद कला महाविद्यालय लातूर यांचे मतदानाचा अधिकार लोकशाहीचा आधार या विषयावर गुगल मीटच्या माध्यमातून ऑनलाईन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अनिल चिद्रावार होते. त्यांनी राष्ट्रीय मतदार दिवसा निमित्त सर्व मतदारांना शुभेच्छा दिल्या. राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करण्याची पार्श्वभूमी सांगितली. प्रमुख वक्ते म्हणून आपले विचार मांडताना प्रा.डॉ.संतोष पाटील यांनी राष्ट्रीय मतदार दिवसाचे महत्त्व सांगितले.

मतदानाचा हक्क लोकशाहीचा आत्मा,केंद्रबिंदू आहे. सुदृढ लोकशाहीचा पाया मतदान आहे. मतदानाचा दिवस सुट्टीचा दिवस असतो हा नकारात्मक भाव बाळगणारा वर्ग लोकशाहीसाठी घातक आहे. मतदानाचा हक्क आपले लोकप्रतिनिधी निवडण्याचा सरकार बनवण्याचा व सरकारमध्ये बदल करण्याचा अधिकार देतो. मतदानाचा हक्क निर्भीडपणे व निष्पक्षपणे बजवावा युवकांनी उत्स्फुर्तपणे निवडणुकीत सहभाग घेवून मतदानाचा हक्क बजवावा. राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करण्याची भुमिका व उद्दिष्टे याप्रसंगी सांगितले. सक्तीच्या मतदानाचा कायदा करणे लोकशाहीसाठी घातक आहे असे विचार मांडले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ.रत्नाकर लक्षटे यांनी केले.तसेच या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा.डॉ.माधव चोले यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा.सुक्ष्मा भोसले यांनी केले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील शिक्षकवृंद तसेच विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला.